महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक- आरएमएसए २०१०/(५०७/१०)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० जून २०१०.

वाचा:-१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आरएमएसए २०१०/(२३/१०)/माशि-१, दि. १९ मार्च २०१०.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आरएमएसए २०१०/(९०/१०)/माशि-१, दि. १९ एप्रिल २०१०.
३)शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आरएमएसए २०१०/(५४४/१०)/माशि-१, दि. २३ जून २०१०.
४) शिक्षण विभाग, भारत सरकार यांच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासंदर्भातील सूचना.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या अकराव्या व बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान सुरु करण्यात आले असून सन २०१७ पर्यंत माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे हे या योजनेचे प्रमुख्र उद्दिष्ट आहे. सन २०१७ पर्यंत एकात्मिक पध्दतीने राज्याच्या भागीदारीने हा कार्यक्रम अंमलात आणावयाचा आहे. माध्यमिक शाळेमध्ये जाणाऱ्या सर्व मुलामुलींना २०१७ पर्यंत जीवनावश्यक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची ग्वाही राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान उपक्रमांतर्गत देण्यात आलेली आहे.

२. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची अंमलबजावणी राज्यामध्ये देखील प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत गतवर्षी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचलित माध्यमिक शाळांतील ५००० शिक्षकांना यशदातर्फे प्रशिक्षण, १२० माध्यमिक शाळांमध्ये प्रसाधनगृहांचे बांधकाम, मायनर रिपेअर्स याकरिता संदर्भांकित शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून कार्यवाही सुरु आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाकरिता परस्पेक्टीव्ह प्लॅन तसेच वर्ष २०१०-११ चा वार्षिक आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात येत आहे.

३. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान हा उपक्रम समाजाच्या सहकार्याने यशस्वी करावयाचा आहे. या प्रकल्पासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र शासनाचे आर्थिक सहाय्य ७५ टक्के तर बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत केंद्र शासनाचे आर्थिक सहाय्य ५० टक्के राहणार आहे.

४. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत समाविष्ट केलेले उपक्रम केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प आराखडयानुसार व त्यासाठी विहित असलेल्या निकषानुसार अंमलात येणार आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासाठी केंद्र शासन त्यांच्या हिश्श्याची रक्कम याकरिता स्थापित केलेल्या सोसायटीच्या खात्यात जमा करणार आहे.

५. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हा समिती, जिल्हा कार्यकारिणी व शाळा व्यवस्थापन व विकास समिती गठित करण्यात येतील. यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या आहेत.

## जिल्हा समिती :-

जिल्हा समिती ही राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाकरिता गठित करण्यात आलेल्या सोसायटीची जिल्हा शाखा असेल.

जिल्हा समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

- संबंधित जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे जिल्हा समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील .
- जिल्हा परिषदेच्या सर्व विषय समित्यांचे सभापती, कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी आणि कार्यक्रमाशी संबंधित संस्थांचे प्रतिनिधी जिल्हा समितीचे सदस्य असतील.
- अशासकीय सदस्यांची नियुक्ती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षांचे मान्यतेने करतील.
- जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी(माध्यमिक) हे जिल्हा समितीचे पदसिध्द सदस्य सचिव असतील.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत जिल्हयात कार्यान्वित असलेल्या उपक्रमांच्यां प्रगतीचा आढावा घेणे आणि उपक्रमांची संबंधित संस्था आणि व्यक्तींचा कार्यक्रमातील सहभाग वाढविणे ही जिल्हा समितीचे प्रमुख कामे असतील.

## जिल्हा कार्यकारिणी समिती :-

कार्यक्रमांच्या जिल्हा स्तरावर अंमलबजावणी संबंधीचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार जिल्हा कार्यकारिणी समितीला असतील.

जिल्हा कार्यकारिणी समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

- जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील.
- शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद हे या समितीचे पदसिध्द सदस्य सचिव असतील.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा समितीच्या अध्यक्षांचे मान्यतेने जिल्हा समितीवरील सदस्य, कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी आणि संस्थांचे प्रतिनिधी यांची जिल्हा कार्यकारिणीवर नियुक्ती करतील.
- जिल्हा कार्यकारिणीवरील समिती सदस्यांची एकूण संख्या १५ पर्यंत राहील.
- या समितीस राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान कार्यक्रमासाठी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान(जिल्हयाचे नाव) या नावाने सुरु करण्यास आणि त्या खात्याचे व्यवहार अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## शाळा व्यवस्थापन व विकास समिती :-

प्रत्येक माध्यमिक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन व विकास समिती स्थापन करण्यात यावी. शाळा व्यवस्थापन व विकास समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

- शाळेचे प्राचार्य/ मुख्याध्यापक हे या समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील.
- समाजशास्त्र, विज्ञान, गणित या विषयांचे प्रत्येकी एक शिक्षक पालकांमधून एक स्त्री व एक पुरुष, स्थानिक स्वराज्य संस्थांचे दोन, अनुसूचित जाती जमातीमधील एक, शैक्षणिकदृष्टया मागास समाजातील एक, महिला संघटना, बचत गट यातील एक, ग्रामशिक्षण समिती/वॉर्ड शिक्षण समिती यामधील एक हे या समितीचे सदस्य असतील.

- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे विज्ञान, कला यांचे प्रत्येकी एक तज्ञ व शिक्षण विभागातून एक या तीन सदस्यांचे नामनिर्देशन करतील.
- वित्त व लेखा विभागातील एक सदस्य राहील.
- उपप्राचार्य किंवा सर्वात ज्येष्ठ शिक्षक हा या समितीचा सदस्यसचिव राहील.
- या समितीस राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान कार्यक्रमासाठी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (शाळेचे नाव) या नावाने सुरु करण्यास आणि या खात्याचे व्यवहार अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. या सर्व समित्यांचे काम राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाकरिता गठित करण्यात आलेल्या सोसायटीतर्फे तयार केलेल्या नियमावलीनुसार चालेल व यासंदर्भात सर्व जिल्हयांना सविस्तर सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील. तसेच राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी संबंधित जिल्हास्तरीय माध्यमिक शिक्षण खात्यामार्फत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

७. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सन २००९-१० या वर्षात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासाठी स्वतंत्र बँक खाते सुरु करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाकरिता स्वतंत्र सोसायटी गठित होईपर्यंत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या सोसायटीमार्फतच कामकाज पाहण्यात येईल. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाकरिता गठित करण्यात यावयाची सोसायटी ही स्वायत्त संस्था राहील व सदर परिषद ही शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील.

८. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी राज्य स्तरावर व जिल्हा स्तरावर प्रकल्प कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

<u>राज्य स्तरावरील पदे :-</u>

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १ | राज्य प्रकल्प संचालक | १ |
| २ | राज्य प्रकल्प समन्वयक | १ |
| ३ | सहसंचालक | १ |
| ४ | सहायक संचालक | २ |
| ५ | कार्यक्रम अधिकारी | ५ |
| ६ | उपसंचालक वित्त व लेखा | १ |
| ७ | लेखा सहायक | ३ |
| ८ | रोखपाल | १ |
| ९ | कनिष्ठ लिपिक (लेखा) | ३ |
| १० | उपसंचालक संगणकप्रणाली | १ |
| ११ | प्रोग्रॅमर | २ |
| १२ | प्रकल्प अभियंता | १ |

| | | |
|---|---|---|
| १३ | उपअभियंता | १ |
| १४ | प्रशासन अधिकारी | १ |
| १५ | कार्यालय सहायक | ४ |
| १६ | सहायक नि डाटाएन्ट्री ऑपरेटर | ८ |
| १७ | लघुटंकलेखक नि स्वीय सहायक | ३ |
| १८ | कनिष्ठ लिपक | ६ |
| १९ | सेवक | ८ |
| २० | वाहन चालक | २ |
| २१ | रखवालदार | १ |
| २२ | सफाईगार | २ |

जिल्हा स्तरावरील पदे :-

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा प्रकल्प समन्वयक | १ |
| २ | सहायक जिल्हा प्रकल्प समन्वयक | १ |
| ३ | सहायक लेखाधिकारी | १ |
| ४ | रोखपाल नि लेखा सहायक | १ |
| ५ | संगणक प्रोग्रॅमर | १ |
| ६ | सहायक अभियंता | १ |
| ७ | समन्वयक | ३ |
| ८ | सहायक नि डाटाएन्ट्री ऑपरेटर | ५ |
| ९ | लघुटंकलेखक | १ |
| १० | कनिष्ठ लिपिक (लेखा) | १ |
| ११ | सेवक | २ |

९. वरील सर्व पदांची नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई सेवा नियमावली १९९४ नुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदे ही कंत्राटी पध्दतीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील व या पदांच्या नियुक्तीसंदर्भातील सर्व अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांना राहतील.

१०. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीकरिता निर्माण करण्यात येणारी ही पदे उपक्रमाच्या अंमलबजावणीपर्यंत चालू राहतील. सदर पदे ही कंत्राटी पध्दतीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. तसेच या उपक्रमाकरिता उपलब्ध असलेल्या निधीतून या पदांवरील खर्च भागविण्यात येईल.

११. संदर्भांकित शासन निर्णय, दि. २३ जून २०१० अन्वये केंद्र शासनाच्या माध्यमिक शिक्षणासंदर्भातील विविध योजनांच्या प्रशासकीय नियंत्रणाबाबतचा तपशिल नमूद करण्यात आलेला आहे.

<u>राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे कार्यालय :-</u> राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे मुख्य कार्यालय जवाहर बालभवन, मुंबई येथे व उपकार्यालय पुणे येथे स्थापन करण्यासाठी या शासन आदेशानुसार मान्यता देण्यात येत आहे.

<u>राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे कार्यक्षेत्र :-</u>

महाराष्ट्रातील आठ शैक्षणिक विभागातील सर्व जिल्हे, महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये आणिक महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

| विभाग | जिल्हे |
|---|---|
| मुंबई | मुंबई, बृहन्मुंबई, ठाणे, रायगड |
| पुणे | पुणे, अहमदनगर, सोलापूर |
| नाशिक | नाशिक , धुळे, जळगाव, नंदुरबार |
| औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड,हिंगोली |
| लातूर | लातूर, उस्मानाबाद, नांदेड, |
| कोल्हापूर | कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली |
| अमरावती | अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला |
| नागपूर | नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा |

१२. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान ही योजना सध्या केवळ राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांनाच लागू आहे. फक्त शिक्षण प्रशिक्षण हे मात्र खाजगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांना लागू राहणार आहे. सन २०१०-११ मध्ये माध्यमिक शाळांतील सुमारे १,४०,००० शिक्षकांना यशदा या महाराष्ट्र शासनाच्या शिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक शाळांचे उच्चीकरण, अतिरिक्त वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रसाधनगृहे, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक- 201006301721237001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)/(प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.

महालेखापाल(लेखापरीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१-२, मुंबई, नागपूर

संचालक, लेखा व कोषागारे, पुणे

वरिष्ठ कोषाधिकारी, जि. पुणे / अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/बांद्रे

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

वित्त विभाग, कार्यासन कोषा-प्रशासन-५, व्यय-५, अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-८, मंत्रालय, मुंबई

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री (शालेय शिक्षण)यांचे खाजगी सचिव / मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने/ मा.प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक /निवड नस्ती माशि-१.